किंमत १० रुपये • पृष्ठे १०४ • नोव्हेंबर २०१३ • वर्ष ६ वे • अंक ६४ वा.

राष्ट्रवादी

स्वाभिमानी आचार! राष्ट्रवादी विचार!!



'कांताई बंधारा' हा भवरलालभाऊंच्या कर्तृत्वातला आणखीन एक मानबिंदू

उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे गौरवोद्‌गार

जैन इरिगेशन सिस्टीम्स् लि., जळगाव यांच्या वतीने जळगाव येथे बांधण्यात आलेल्या 'कांताई बंधाऱ्या'चे उद्‌घाटन उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या शुभहस्ते आणि जलसंपदामंत्री सुनील तटकरे यांच्या उपस्थितीत १६ ऑक्टोबर रोजी झाले. त्या समारंभाचा हा वृत्तांत.

जैन इरिगेशन सिस्टीम्स् लिमीटेडच्या सहयोगाने साकार झालेल्या कांताई बंधाऱ्याच आज आपल्या सर्वांच्या साक्षीनं उद्‌घाटन झाले असे मी जाहीर करतो, जलपुजन झाले असेही मी जाहीर करतो. आणि व्यक्तिशः माझ्या वतीनं, सर्वांच्याच वतीनं आदरणीय कांताईंच्या स्मृतीला मी विनम्र अभिवादन करतो.

खूप दिवस चाललेल होतं की मी ह्या आजच्या कार्यक्रम ाच्या निमित्तानं आपल्या जळगावच्या परिसरामध्ये आल पाहिजे. भाऊंनी पण मला एकदा-दोनदा बोलून दाखवल, त्याच्यामध्ये अशोकराव, अजितजी, अभय, अतुलजी हे सगळेच सांगत होते की तुम्ही त्या ठिकाणी या. आम्ही राजकिय क्षेत्रामध्ये काम करणारे कार्यकर्ते हे वेगवेगळ्या उद्‌घाटनाच्या भुमिपूजनाच्या निमित्तानं येत असतो. परंतु खरोखरीच आपल्या राज्यामध्ये सरकारच्या व्यतिरीक्त एक सामाजिक बांधिलकी मनामध्ये ठेवून जे अनेक मान्यवर काम करतात त्यांचही काम कस चाललेल आहे, त्याही कामामध्ये काम करत असताना अडीअडचणी येतात त्या आपल्याला कशाप्रकारे दूर करता येतील आणि त्यांनी केलेल काम बघितल्यानंतर देखील ज्या वेळेस आमच्यासारखे मंत्रिमंडळामध्ये बसून धोरण ठरवत असतात. त्यावेळेस धोरण ठरवत असताना अशा प्रकारच्या कामाचा खूप चांगल्याप्रकारे त्या ठिकाणी उपयोग होत असतो. आणि त्याच्यामुळेच भाऊंनी

आणि जैन इरिगेशननी नेहमीच सामाजिक बांधिलकी जोपण्याच काम त्या ठिकाणी केलेल आहे. त्याच्यामध्ये उच्च व्यावसायिक मुल्यांची जाण भाऊंना असल्यामुळं सामाजिकतेच चांगल भान आम्ही लहानपणापासून त्यांच्याकडे बघतो आहे. व्यावसायिकता आणि त्यांच्या सामाजिक कार्यात कधीच अडथळा ठरलेला नाही आहे. उलट उद्योगाच्या निमित्तानं त्यांनी हजारो कुटुंबांना रोजगार त्या ठिकाणी उपलब्ध करून दिले. अनेक कुटुंब नुसते आपले जळगाव परिसरामध्ये नाही आहेत तर जगामध्ये अनेक ठिकाणी त्यांची जैन उद्योग समुहाची जी काही काम चाललेली आहेत उद्योग चाललेले आहेत त्याच्यातून पण खूप मोठ्या प्रमाणावर त्या ठिकाणी कुटुंब उभी राहिली, रोजगार उभा राहिला. आणि वाढत्या स्पर्धेत जास्तीतजास्त रोजगार आजच्या घडीला उपलब्ध करून देण हे सोप काम नाही.

आपण बरेच जण पेपर वाचतो, टिव्ही पाहतो, बातम्या ऐकतो, आपण इतके दिवस अमेरिकेला महासत्ता आजही म्हणतो. परंतु ओबामांच्यावर काय आज परिस्थिती निर्माण झाली, दुसऱ्यांदा ओबामांनी अमेरिकेची सुत्र घेतल्यानंतर दहा लाख लोकांना त्या सरकारमध्ये काम करत असणाऱ्यांना तिथे कमी कराव लागल. आज एक महासत्ता असणाऱ्या देखील देशाला कशाप्रकारच्या या मंदीच्या काळामध्ये सामोर जाव लागलेल आहे हे आपण सगळ्यांनी बघितलेल आहे. आणि त्याच्यामुळे आपल्या देशानी तर खुल्या आर्थिक धोरणाचा स्वीकार केला. डॉ. मनमोहनसिंग असतील, पवार साहेब असतील, पी. चिदंबरमजी असतील अनेक मान्यवर त्याच्यामध्ये काम करतात. आणि त्याच्यामुळे हे काम करीत असताना तेजी-मंदी सगळीकडेच असते, परंतु ही तेजी-मंदी येत असताना आपण काय निर्णय घेतले पाहिजे हे लक्षामध्ये घेऊन त्याच्यातून रोजगार निर्माण झाला पाहिजे त्याच्यातून आमचा बळिराजा सुखी झाला पाहिजे. आणि म्हणूनच या जैन उद्योग समुहानी एक यशस्वी उद्योग समुह म्हणून संपुर्ण जगभर त्या ठिकाणी ख्याती मिळवलेली आहे.

या समुहाला मिळालेले विविध राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पुरस्कार त्यांच्या कर्तृत्वाची पावती आपल्याला सगळ्यांना देतात. आज देखील भाऊंनी उद्योजकांपेक्षा एक माणूस म्हणून त्यांच काम खूप मोठ आहे. मुळात ते दानशूर स्वभावाचे आहेत. आपल्या खान्देशच्या पवित्र प्रसिद्ध त्या ठिकाणी कवयित्री बहिणाबाई चौधरींनी त्यांच्या एका कवितेमध्ये - 'अखडला दानासाठी त्याले हात म्हणू नयी' ही ओळ त्यांनी अगदी मनापासून जपलेली आहे. काही माणस उगाच मोठी होत नाहीत त्यामागे कष्ट असतात. आणि भाऊंच्या बाबतीमध्ये यशाच एकवेळ भाऊंच आजपर्यंतच मोजदाद करता येईल. मला आत्ताच भाऊ म्हणाले की अजित एक्कावन वर्ष झालीत ज्या वेळेस त्यांनी सुरुवात केली या एकंदरीत कामाला, बघता बघता काळवेळ कुणाकरीता थांबत नसते, एक्कावन वर्ष झाली.

आणि आम्ही दोघ जणं बोलत होतो परंतु एकवेळ भाऊंनी आजपर्यंत जे काही यश मिळवलेल आहे त्याच आपल्याला एकवेळ मोजदाद त्या ठिकाणी करता येईल. पण त्यांनी या समाजाकरीता आणि या उद्योग समुहाकरीता घेतलेले कष्ट आहेत त्या कष्टाची कधीच मोजदाद करता येणार नाही. आजही ते प्रचंड अशाप्रकारची मेहनत घेत आहेत. वय वर्ष इतक आहे तरी देखील सकाळी उठण, लोकांमध्ये मिसळण, आपल्या संबंधातली ती काम

त्या ठिकाणी मार्गी लावण आणि त्याच्यामुळ त्यांची प्रचंड अशा प्रकारची मेहनत हे सगळ उभ करण्याकरीता निश्चितपणे यशस्वी त्या ठिकाणी झालेली आहे. कांताई बंधारा हा त्यांच्या कर्तृत्वातला आणखी एक मानबिंदू त्या ठिकाणी ठरणार आहे. कांताई हे नाव म्हणजे कुटुंबवत्सल्याच प्रतिक आहे. आपण प्रत्येकवेळा म्हणतो की यशस्वी पुरुषाच्या मागे एक त्या ठिकाणी स्त्री असते. आपण महात्मा फुले यांच उदाहरण घ्या. परवा एक दुःखद घटना घडली डॉक्टर दाभोळकरांच्या बाबतीमध्ये त्यांचही उदाहरण सांगतो. मी कालच सातारा जिल्ह्याच्या दौऱ्यावर असताना श्रीमती दाभोळकर ताईंना त्या ठिकाणी भेटायला गेलेलो होतो, त्यांचही काही म्हणण होत. शेवटी ते म्हणण ऐकण त्याच्यामध्ये कशाप्रकारे आपल्या पुढचे निर्णय घेता येतील ते बघण. परंतु हे सगळी मोठी मोठी लोक जी आज हयात आहेत किंवा जे आज हयात नाहीत त्यांच्याही बाबतीमध्ये आपण जर बघितल तर त्यांच्या कर्तृत्वामध्ये त्यांच्या अर्धांगिनीचा अतिशय मोलाचा अशाप्रकारचा वाटा आहे. आणि भाऊंच्याही कार्यामध्ये तेवढच मोलाच योगदान आदरणीय कांताईताईंच होत. आणि त्याच्यामुळे माझ्या दृष्टीने हा कांताई बंधारा नसुन एक कांताईताईंच स्मारक आहे अस म्हटल तर ते जास्त उपयुक्त ठरेल.

वेगवेगळ्या प्रकारे माझ्या आधी खासदार बोलले, आमदार बोलले, माझ्या मंत्रिमंडळातील सहकारी बोलले. खरतर पुढे पण काही कार्यक्रम आहेत त्याच्यामुळे काही सहकार्यांना आपले विचार मांडायचे होते परंतु बोलता आले नाही.

आम्ही, आज मी इथे येत असताना आवर्जून सकाळी लवकर मी आणि सुनिल तटकरे साहेब आलो आणि त्याच्यामध्ये एकंदरीत कशा पद्धतीनं ह्या जैन उद्योग समुहानी ग्रीन एनर्जी पार्क उभा केलेला आहे. कशा पद्धतीनं जैन व्हॅलीमध्ये साडेआठ बायोगॅस वीज निर्मितीचा प्रकल्प हा उभा राहिलेला आम्ही बघितला. १८ तारखेलाच मी आणि राज्याचे मुख्यमंत्री आम्ही दोघही साक्रीला धुळे जिल्ह्यामध्ये तिथे आपण सव्वाशे मेगावॅटचा सोलरचा प्रकल्प केलेला आहे. त्याच्या उद्घाटनाला येणार होतो परंतु काही कारणानिमित्त तो थोडासा कार्यक्रम पुढे ढकलला गेलेला आहे. लवकरच आम्ही येऊ आणि त्याच त्या ठिकाणी उद्घाटन करू.

शेवटी जी ऊर्जा आहे ती वेगवेगळ्या पद्धतीनं आपण त्या ठिकाणी जमवण्याच काम आणि विकासाकरीता त्या ऊर्जेचा उपयोग कसा होईल ते बघण्याच काम त्या ठिकाणी करायच आहे. म्हणून आम्ही विंडमिलमध्ये लक्ष घातल आहे, सोलर एनर्जीमध्ये लक्ष घातल आहे, हायड्रो एनर्जीमध्ये त्या ठिकाणी लक्ष घातल आहे. त्याच्यामध्ये आपल्या वेगवेगळ्या प्रकारे को-जनरेशन. साखर कारखान्यातून पण आपण वीज त्या ठिकाणी तयार करायला लागलो आहे. गॅसवर आधारीत वीज प्रकल्प पण आपण हातामध्ये घेतले. कोलबेस देखील विद्युत प्रकल्प आपण हातामध्ये घेतले. परंतु आज हे सगळ बघत असताना ज्या वेळेस भाऊंनी मोठ्या कष्टानी या परिसरामध्ये जे गांधीतीर्थ उभ केलेल आहे, मला पवार साहेबांनी पण सांगितलेल होत की अजित कधीतरी तुला संधी मिळाली तर अवश्य जाऊन बघ.

बऱ्याचदा जिथ पिकत तिथ विकत नसत. माझी तर सर्वांना विनंती आहे महात्मा गांधींनी त्या काळामध्ये केलेल काम आता नवीन पिढीला जर आपण वाचल तरच ते लक्षामध्ये येत. बर वाचनाची आवड लोकांना दिवसेंदिवस कमी होत चाललेली आहे. आणि त्याच्यावर नवीन जनरेशननी देखील अहिंसा मार्ग म्हणजे काय? आपण कस काम करू शकतो? अहिंसा मार्गाने देखील ब्रिटीशांसारख्या सरकारला कसे आपण हटवू शकतो, त्या

भवरलाल जैन हे कांताई बंधाऱ्याची प्रतिकृती अजित पवार यांना भेट देऊन त्यांचे स्वागत करताना.
शेजारी सुनिल तटकरे, ना.धों. महानोर, संजय सावकारे, गुलाबराव देवकर, शिवाजीराव देशमुख

जैन इरिगेशन कंपनीने उती संवर्धन पद्धतीने तयार केलेल्या केळीच्या रोपांची अजित पवार पाहणी करताना, शेजारी भवरलाल जैन, अतुल जैन, सुनिल तटकरे व गुलाबराव देवकर.

तिथ बारकाईन आपल्याला बघायला मिळतात. खरतर हे खूप मोठ काम भाऊंच्या प्रेरणेनी त्या ठिकाणी गांधीतीर्थाच्या निमित्तानं उभ राहीलेल आहे. नवीन नवीन शाळेमध्ये शिकणाऱ्या मुला-मुलींनी अवश्य त्या ठिकाणी याव ते बघाव. त्याच्या संदर्भामध्ये मी पण माझ्या मंत्रिमंडळातल्या अनेक सहकाऱ्यांना सांगणार आहे की जळगावच्या परिसरामध्ये गेल्यानंतर ते एकदा बघा. शेवटी सेवाग्राम असेल, गांधीतीर्थ असेल अनेक काही चांगली कामं समाजामध्ये त्या ठिकाणी उभी राहिलेली आहेत.

अलिकडे समाज झटपट श्रीमंत होण्याचा विचार करतो. कमी कष्टामध्ये दोन पैसे कसे मिळतील अशा प्रकारचा विचार त्या ठिकाणी सातत्याने चाललेला असतो, परंतु बाबांनो तशा पद्धतीनं पैसा फार काळ जवळ राहत नसतो हे देखील अशांनी लक्षामध्ये ठेवल पाहिजे. शेवटी कष्ट त्याच्यामध्ये स्वतःला झोकून देऊन त्या ठिकाणी काम करण ह्या गोष्टी खूप त्या ठिकाणी महत्त्वाच्या असतात आणि त्याच्यामुळच अलिकडच्या काळात हे ज्या वेळेस प्रपोजल माझ्याकडे आलेल होत त्यावेळेस तो विभाग माझ्याकडे होता आणि सरकारच काम स्वतः जैन उद्योग समुह करू पाहत होता. इथंही हे काम उभ राहिल्यानंतर ५० टक्के पाणी हे जैन उद्योग समुहाला मिळणार होत पण बाकीच ५० टक्के पाणी ह्या परिसरातल्या माझ्या शेतकऱ्यांना मिळणार आहे, आमच्या बळीराजाला मिळणार आहे, त्याचा लाभ त्यांना मिळणार आहे. आणि नुसत हे होणार नाही तर जमीनीमध्ये जिरवलेल्या पाण्यामुळे ह्या परिसराम ध्ये भुगर्भातली पाण्याची पातळी, विहीरीच्या पाण्याची पातळी वाढण्याकरीता निश्चित म दत होणार आहे. आणि या बंधाऱ्याच्या माध्यम ातून स्वार्थातून परमार्थ साधला गेला आहे अस म्हटल तरी देखील ते योग्य ठरेल. आणि आधुनिक भारताच एक छोटस हे मंदिर आहे. अशा कार्यासाठी भाऊंनी ज्या पद्धतीन काम केलेल आहे तस इतर देखील उद्योगपतींनी या प्रकारची प्रेरणा जर घेतली तर खूप चांगल काम होईल.

कारण आजच मला अनेकांनी, जस आपण धुळ्यामध्ये नदीजोड कार्यक्रम, आपल्या जळगावमध्ये नदीजोड कार्यक्रम अशा पद्धतीचे कार्यक्रम घेण्याचा आपण प्रयत्न करतो. गेल्या वर्षी उन्हाळ्यामध्ये आम्ही सगळे जणं दुष्काळाला सामोरे गेलो. आपल्याही जळगावमध्ये त्याची जबरदस्त किंमत तुम्हाला मला मोजावी लागली, राज्यामध्ये मोजावी लागली. जनावरांच्या छावण्या सुरू केल्या, टँकर सुरू केले, त्याच्यामध्ये पिण्याच्या पाण्याच्या योजना केल्या, मनरेगाची काम त्या ठिकाणी केली. परंतु एक आम्ही बघितल ह्या वेळेस जाणीवपुर्वक वसंत बंधारे झाले, वनराई बंधारे झाले. परवाच आपले धारीया साहेब आपल्या सर्वांना सोडून गेले. आम्ही सगळे जणं तिथ एकत्र जमलो होतो. या सगळ्यांनी राजकारण सोडल्यानंतर एक समाजाच भल करण्याकरीता जे व्रत स्वीकारलेल होत त्याच्यातून ही सगळी काम झाली. आता त्याच्यात आमच्या एक गोष्ट लक्षात आली नाला खोलीकरण, नाला सरळीकरण, नाला रुंदीकरण, सिमेंट बंधारे. पहिल्या टप्प्यामध्ये अर्थमंत्री या नात्याने मी दीडशे कोटी रुपये त्या ठिकाणी मंजूर करून दिले. आणि ती काम झाल्यानंतर ज्या भागामध्ये प्रचंड दुष्काळ पडतो, आपल्या इथे तरी किमान ४० इंच पाऊस पडतो. महाराष्ट्रात काही भाग असा आहे की तिथ १३-१४ इंचाच्या पुढे पाऊस पडत नाही. आणि म्हणून

त्या भागामध्ये आम्ही अग्रक्रमानी अशा प्रकारचे सिमेंट बंधारे घेतले. यंदा पाऊस चांगला झाला, परतीचा पाऊस पण पडतो आहे. परवाच वादळ ओरिसा आणि त्या भागामध्ये आलेल होत त्या वेळेस किती लाख लोकांना आपण स्थलांतर केल ते बघितल. आणि त्याच्यातून त्या वादळाचा वेग तिथ २०० किमी ऐवजी १०० किमी झाल. त्यामुळे नुकसान झाल परंतु कमी प्रमाणामध्ये झाल. आणि हे सगळ बघितल्यानंतर आज परतीचाही पाऊस काल पण मी पुण्यामध्ये असताना संध्याकाळी पाऊस त्या ठिकाणी पडला. म्हणजे पाऊस पडतो आहे. आज इथून गिरणा नदी आपण इथ बंधारा बांधला आहे. मी सहज आमच्या इरिगेशनच्या अधिकाऱ्यांना विचारत होतो - आज आपल्या गिरणा नदीतून ज्याला आपण सगळे जणं गिरणामाय या नावानी ओळखतो, आज जामदा बंधाऱ्यापासून तीन टीएमसी पाणी हे गिरणा नदीतून वाहील. आणि दहिगाव बंधाऱ्यापासून दहा टीएमसी पाणी त्या ठिकाणी वाहून गेल. अजूनही पाणी वाहत आहे. आता जे पाणी वाहत आहे त्याचा जर विचार केला तर दोन दिवसामध्ये इथून एक टीएमसी पाणी जवळपास वाहत आहे. म्हणजे एवढ पाणी आज वाहत आहे आज याचा विचार केला तर आम्ही सतत विचार करतो की काय केल पाहिजे, त्याचा उल्लेख सुनिल तटकरे साहेबांनी बऱ्याचशा बाबतीमध्ये केला. गुलाबरावांनी त्याचा उल्लेख केलेला होता. म्हणून मी त्याचा उल्लेख आपल्या सगळ्यांसमोर पुन्हा करू इच्छित नाही. त्यामध्ये त्यांनी लक्ष घातलेलच आहे पण बघा गिरणा नदीतून एवढ पाणी वाहून गेल तरी देखील आजच्या तारखेला गिरणा नदीच्या वर जे धरण बांधलेल आहे त्या गिरणा धरणामध्ये पाणी किती टक्के? ४४ टक्के आहे. म्हणजे धरण आहे साडे एकविस टीएमसीच. धरणाच्या वरच्या भागामध्ये पाऊस पडला नाही, धरणाच्या खालच्या भागामध्ये पाऊस पडला. आणि हे सगळ जवळपास इतक मोठ पाणी आज तापी नदीतून उकाईला निघून गेल.

तापीला आम्ही बॅरेज बांधले. आताच येताना सुनिल तटकरे साहेब मला सांगत होते मला आठवत आहे गोदावरी नदीवर आम्ही नाथसागर पासून शेवटचा बंधारा त्या ठिकाणी इथपर्यंत सगळीकडे आम्ही बंधारे बांधले. शेवटचा बंधारा बांधताना तर मला इतकी अडचण आली सुप्रिम कोर्टामध्ये आंध्र सरकार त्या ठिकाणी गेल. आम्ही पंतप्रधानांना भेटायला गेलो, मला वाटत अशोकराव चव्हाण त्यावेळेस मुख्यमंत्री होते. आणि आम्ही सगळे जणं त्या बंधाऱ्याच्या बाबतीमध्ये पंतप्रधानांना भेटलो आणि सांगितल की याच्यात तुम्ही लक्ष घाला हे आता सुप्रिम कोर्टामध्ये मॅटर आहे, मी जास्त काही त्याच्याबद्दल बोलणार नाही. सुदैवानी सुप्रिम कोर्टाचा निकाल आपल्या बाजूने लागला. मला वाटत २८ तारखेला सुनिल तटकरे त्याच जलपुजन करायला जातात. तिथपर्यंत आम्ही जर थांबलो असतो आणि आता बंधाऱ्याच काम

सुरू केल असत तर माझ्या नांदेडच्या जनतेला फायदा झाला असता का? आज तापी नदीवर वेगवेगळ्या प्रकारचे बॅरेजेस् आपण केले. प्रकाशावरून किती पाणी जात? परवा मी शहाद्याला होतो त्यावेळेस बघितल प्रचंड पाणी जात. आज वेगवेगळ्या प्रकारची धरण लवकर व्हावीत.

सगळे खासदार आमदार सातत्यानी आम्हाला भेटत असतात. त्यांनाही वाटत की आपल्या स्वतःच्या टर्ममध्ये आपल्या भागातले हे सगळे प्रश्न सुटावेत. परंतु हे प्रश्न सोडवत असताना निधी ही एक महत्त्वाची समस्या. आणि राज्यपाल महोदयांनी सांगितल की जो अनुशेष आहे त्याचा विचार करून तुम्ही त्या ठिकाणी निधी दिला पाहिजे. आम्हालाही वाटत की या भागातले प्रश्न सोडविण्याकरीता आपण लवकरात लवकर निधी दिला पाहिजे, अशा पद्धतीन पाणी अडवल गेल पाहिजे, परंतु विदर्भाचा पण त्या ठिकाणी अनुशेष भरून काढायचा आहे. मराठवाड्याचा पण त्या ठिकाणी अनुशेष भरून काढायचा आहे. उर्वरीत महाराष्ट्रामध्ये आपला उत्तर महाराष्ट्र आत्तापर्यंत कधी कधी आपल्यालाही त्याचा त्रास त्या ठिकाणी सहन करावा लागतो. आणि म्हणून उत्तर महाराष्ट्र याच वेगळ महामंडळ कराव, कोकणच वेगळ महामंडळ कराव, परंतु त्याला अजून केंद्र सरकारने मान्यता दिलेली नाही. परंतु हा प्रयत्न हा निश्चितपणे आम्ही सगळे जणं करतो आहे.

आज तर नाथसागरला पाणी मला वाटत ३३ टक्के जायकवाडीला आहे, त्याच्यामुळे काहीतरी प्रमाणामध्ये प्रश्न सुटला आहे. तरी देखील खालची लोक म्हणतात वरच पाणी सोडा, वरची लोक म्हणतात की आमच पाणी कस काय तुम्ही सोडणार आहे? आज पिण्याच्या पाण्याकरीता गावा गावामध्ये, जिल्ह्याजिल्ह्यामध्ये, तालुक्या तालुक्यामध्ये वाद व्हायला लागलेले आहेत. आणि त्याच्यातून सामोपचारानी कसा हा मार्ग काढता येईल या बद्दलचा प्रयत्न आमचे सुनिल तटकरे आणि शशिकांतजी शिंदे हे दोन जणं या विभागाचे मंत्री आहेत ते त्या ठिकाणी करत असतात. माझा आणि मुख्यमंत्र्यांचा पण प्रयत्न त्याच पद्धतीनं असतो की बाबा याच्यातून व्यवहारी मार्ग कसा काढता येईल, नाराजी त्या ठिकाणी कशी कमी करता येईल.

पाणी हे अलिकडच्या काळामध्ये जीवन झालेल आहे. अगदी शाळेपासून आपल्या सगळ्यांच्याच कानावर अशा प्रकारच्या गोष्टी पडायला लागलेल्या आहेत. निसर्गाकडून आपल्याला पाणी विनामुल्य त्या ठिकाणी मिळत. तरी देखील ते बहुमोल अशा प्रकारच आहे. पाण्याच महत्त्व फार पुर्वीच कळलेल असताना देखील आज देखील आपण पाण्याच्या बचतीबाबत उदासिनता दाखवतो आहोत. धरण बांधण, विहीरी खोदण, पाईपलाईन करण. टाकी बांधण किंवा नळाला किंवा पाटाला पाणी आल याचा अर्थ पाणी टंचाई किंवा पाणी प्रश्न सुटला असा होत नाही. आणि पाणी प्रश्न नेटक्या व्यवस्थापनातूनच त्या ठिकाणी सुटू शकतो हे आपण सगळ्यांनी ध्यानामध्ये घेतल पाहिजे.

तुमच्या माझ्या जळगावमध्ये तर केळीच पिक आहे. आम्ही ज्या पश्चिम महाराष्ट्राच प्रतिनिधीत्व करतो तिथं ऊसाच पिक आहे. आणि नेमकी ही दोन पिकच सर्वात जास्त पाणी घेतात, त्याच्याकरीता ठिबक शिवाय आपल्याला गत्यंतर नाही. मी मुख्यमंत्री, सहकारमंत्री आम्ही सगळ्यांनी मंत्रिमंडळामध्ये ठरवल आहे की इथून पुढ टप्प्या टप्प्यांनी य सगळ्या साखर कारखान्यांनी पाच वर्षामध्ये ठिबकवर गेलच पाहिजे. कपाशीवर आपण ठिबकवर चाललो आहे, आपण फळबागांवर ठिबकवर चाललो आहे. आहे ते पाणी प्यायला द्याव लागत आहे. पिण्याच्या पाण्याचा वापर पण पुर्वीच्या तुलनेमध्ये वाढलेला आहे. कालच पुण्यामधले सगळे लोक आम्हाला मागणी करत होते की आम्हाला जास्तीच पाणी त्या ठिकाणी द्या. शहर प्रचंड वाढता आहेत. आज देखील जळगावच्या परिसरामध्ये काही तलाव दोन वर्ष त्याला पाणी नव्हत परंतु पाऊसकाळ बरा झाला. पाणी त्या ठिकाणी आल. पण या पाण्याचा वापर हा काटकसरीनं तुम्हाला आम्हाला करावा लागेल. त्याच्यामध्ये कृपा करून कोणी त्या ठिकाणी राजकारण आणू नये. थोडासा ओझरता उल्लेख सुनिल तटकरे साहेबांनी केला, काही जणं वेगवेगळ्या पद्धतीनं आरोप करत असतात. जरूर पुरावे असतील तर आरोप केले पाहिजे.

आम्ही आता जनावरांच्या छावण्या सुरू केल्या, त्याच्यामध्ये करोडो रुपयांचा पैसा खर्च केला. जर स्थानिक छावणीमध्ये कुठ भ्रष्टाचार झालेला असेल तर त्याची शहानिशा केली पाहिजे कारण हा समाजाचा पैसा आहे, जनतेचा पैसा आहे, जरूर त्याची चौकशी केली जाईल. मधल्या काळामध्ये काही बँकांनी त्यांना जो अधिकार होता त्या अधिकाराच्या खाली साखर कारखाने विकले, त्याबद्दल देखील आज मोठ्या प्रमाणावर चर्चा आपल्या राज्यामध्ये चाललेली आहे. तुमच्याही जळगाव जिल्ह्यामध्ये काही कारखाने राज्य सहकारी बँकेनी विकले. कारखाने विकायला निघाले त्यावेळस कोणी पुढच आल नाही. बऱ्याचदा कारखान्यांची टेंडर निघाली परंतु कोणी पुढ आल नाही. आम्हालाही वाटत आम्ही पण सहकारामध्ये काम करणारे कार्यकर्ते आहोत. सहकारामध्ये अजिबात कारखाने विकायची वेळ येऊ नये. वेळ आणली कुणी? तिथल्या संचालक बोर्डाने आणली. मुख्यमंत्र्यांनी आणली, उपमुख्यमंत्र्यांनी आणली! काही भागामध्ये ऊस नसतानाही कारखाने उभे केले, तिथ ऊसच गाळायला नाही आहे आणि तो कारखाना आजारी पडला. एकदा कारखाना उभा करण्याकरीता राज्यसरकार मदत करेल, परंतु सतत कारखाना जर आजारी पडायला लागला आणि आम्ही मदत करायला लागलो तर जनता पण आम्हाला विचारणारी आहे ना, तुम्ही कितीदा तिथ मदत करणार आहे?

आज बँका देखील आजारी पडायला लागल्या आहेत, त्याच्यात पण आम्ही मदत केली. मध्ये राज्य सहकारी बँकेला माझ्या माहिती प्रमाणे सव्वा तिनशे कोटी रुपये दिले, आता प्रशासक तिथ आहे. ती सव्वा तिनशे कोटी रुपये दिल्यामुळं एक राज्यातली महत्त्वाची बँक आज त्याला लायसन मिळाल. यंदाच्या वर्षी त्यांचा नफाच जवळपास साडे तिनशे-चारशे कोटी रुपये झाला. शेवटी धुळे असेल जळगाव असेल किंवा राज्यातल्या सगळ्या बँका असतील या सहकारी बँका चांगल्या चालाव्यात. सहकारी साखर कारखाने किंवा सुत गिरण्या चांगल्या चालाव्यात. परवा

आम्ही शहाद्याला गेलो इतकी उत्तम सुत गिरणी चाललेली. परंतु काही ठिकाणी चांगल चालल आहे, काही ठिकाणी ते मात्र चांगल चालत नाही. त्याच पण आत्मपरिक्षण त्या भागातल्या सन्माननिय कार्यकर्त्यांनी, वेगवेगळ्या राजकिय पक्षांच्या प्रमुखांनी आणि लोकप्रतिनिधींनी केल पाहिजे. उगीचच कारण नसताना दुसऱ्यावर त्याचा कुठेतरी आरोप करायचा आणि दुसऱ्याच्या नावावर पावती फाडायची हे मात्र बरोबर नाही.

मी चुकांच कधीच समर्थन करणार नाही. मी गेले २५ वर्ष समाजकारण राजकारण करणारा कार्यकर्ता आहे. मलाही नेहमी वाटत की दर्जेदार काम उभ रहाव.

इथ देखील भाऊंनी जे उभ केल प्रत्येक कामाची क्वालिटी ही इतकी चांगली आहे की आज बंधाऱ्याच पण तुम्ही काम बघितल तर एकदम चांगल्या प्रकारच काम केल. आम्हालाही वाटत जलसंपदानी तशी काम करावी, पीडब्लूडीने त्या ठिकाणी तशी काम करावी. आमचे वेगवेगळे विभाग जलसंधारण असेल किंवा इतर विभाग असतील त्यांनी पण तशा प्रकारची काम करावी. आता तर मला ज्यावेळेस लक्षात आल की सिमेंट बंधारे आणि नाला खोलीकरण सरळीकरण याच्यामधून चांगल्या पद्धतीनं आपण पाणी अडवू शकतो. यंदाच्या वर्षी, गेल्या वर्षी दीडशे कोटी रुपये दिले, यंदा त्या कामाला बजेटमध्ये सहाशे पंच्चावन्न कोटी रुपये आपण ठेवलेले आहेत का? तर झटपट निर्णय त्या ठिकाणी होतात. माझी शेतकऱ्यांना पण विनंती आहे आता पालकमंत्र्यांनी, ना.धों. महानोर साहेबांनी, गिरीष महाजन असतील किंवा गुलाबराव देवकर असतील, दोन्ही खासदार असतील सगळ्यांनी मला सांगितल की दादा आताच्या काळामध्ये आमचं जे पिक आलेल आहे ते पिक त्याला व्यवस्थितपणे त्या ठिकाणी दोन पैसे मिळत नाही. शेतीमालाला हमीभाव जो केंद्रानी राज्यानी जाहीर केला आहे त्याच्यामध्ये त्वरीत खरेदी-विक्री केंद्र त्या ठिकाणी सुरू झाली पाहिजेत. कारण ज्वारी असेल, मका असेल, सोयाबीन असेल, तुर असेल, केळी-कापूस ही ज्यावेळेस तुमच्या माझ्या जळगावमध्ये मुख्य पिक घेतली जातात. आणि आता शासनाकडून शेतीमालाला खरतर पवार साहेब जाणीवपुर्वक त्यांनी कृषिमंत्रालय घेतल. भाऊंचे आणि पवारसाहेबांचे जवळचे संबंध आहेत. पवारसाहेब साडे नऊ वर्ष कृषीमंत्री म्हणून काम करता आहेत. ज्यावेळेस आमचे खासदार त्याच्यामध्ये मग जावळे साहेब असतील, ए.टी. नाना असतील, ठिक आहे त्यांचे राजकिय पक्ष वेगळे आहेत, त्यांचे विचार वेगळे असतील, आमचे विचार वेगळे असतील, आमची भुमिका काही वेगळी असेल, परंतु एकदा निवडून गेल्यानंतर काय निर्णय घेतल्यानंतर आपल्याला त्याचा फायदा होणार आहे, सगळे महाराष्ट्रातले खासदार पवार साहेबांना भेटत असतात. काय तिथे केंद्रानी निर्णय घेतल्यानंतर धान्याला आधारभूत किंमत त्या ठिकाणी मिळेल. आणि आता सगळ्यांनीच मला सांगितल आहे, आपण पण सगळे शेतकरी समाज इथे जमलेला आहे, मी आपल्याला शब्द देतो की काहीही झाल तरी मुंबईला गेल्यानंतर मी सुनिल तटकरे, आमचे संजय सावकारे, आम्ही सगळे जणं हा विषय कॅबिनेटला काढू आणि तातडीनं काही झाल तरी खरेदीविक्री केंद्र शेतीमालाच्या हमीभावाच्या दृष्टीकोनातून त्या ठिकाणी सुरू करू.

माझी शेतकऱ्यांना विनंती आहे सध्या एकदम कमी किंमत पाडून व्यापारी त्या ठिकाणी धान्य खरेदी करता आहेत. थोडे दिवस आम्ही निर्णय घेईपर्यंत थांबा. गेल्या गेल्या त्या ठिकाणी निर्णय आम्ही घेतो परंतु तोपर्यंत तुम्ही कळ काढा. नाहीतर मग व्यापाऱ्यांचा फायदा होईल आणि नंतर खरेदी केंद्र सुरू झाल्यानंतर मग जस कापसाच झाल कमी पैशांमध्ये शेतकऱ्यांचा कापूस घेतला आणि खरेदी केंद्र सुरू झाल्यावर तोच कापूस व्यापाऱ्यांनी पुन्हा सरकारला त्या ठिकाणी विकला. अशाही पाठीमाग घटना घडल्या. कांद्याच्याही बाबतीमध्ये तशा घटना घडल्या आणि म्हणून शुन्य टक्के व्याजानी, दोन टक्के व्याजानी माझ्या शेतकऱ्यांना पीककर्ज देण्याकरीता आम्ही निर्णय घेतले. माझ्या सावकाराच्या दारामध्येच माझ्या शेतकऱ्याला जायला लागू नये ह्याकरीता आम्ही अशाप्रकारचे निर्णय त्या ठिकाणी घेतलेले आहेत, त्याचाही फायदा माझ्या जळगावच्या शेतकरी बांधवांनी त्या ठिकाणी मनापासून करून घेतला पाहिजे. आणि आता जो काही काहींनी खरेदीविक्री केंद्र सुरू करा म्हणून सांगितल आणि काहींनी ओला दुष्काळ जाहीर करा म्हणून सांगितले. एक गोष्ट खरी आहे, मागे पाऊस नव्हता म्हणून दुष्काळ पडला, आता काही ठिकाणी एवढा पाऊस पडला की सोयाबीनची पिक पण खराब झाली. त्याच्यामध्ये कुठकुठ भाताच पिक जिथं असतं तिथं धानाचं पिक ज्याला आपण भंडारा-गोंदिया म्हणतो तिथंही ते खराब झाले.

मधल्या काळामध्ये आम्ही कॅबिनेटनी निर्णय घेतला की जिथ जास्त अतिवृष्टी झालेली आहे तिथ जर पिक खराब झालेली असतील तर सरकारच्या विभागानी त्या ठिकाणी महसूलनी आणि कृषिविभागानी पुढाकार घ्यायचा, पंचनामे करायचे. पंचनामे केल्यानंतर संपुर्ण नुकसान आम्ही भरून देऊ शकणार नाही. पवार साहेब पण केंद्राची कमिटी आहे त्याचे अध्यक्ष आहेत. परवा केंद्राची पण कमिटी जिथे जिथे अतिवृष्टी झाली तिथे तिथे येऊन गेलेली आहे. आम्ही केंद्राकडून पण पैसे घेतो आहे, राज्यसरकारम

ध्ये देखील या कामाकरीता निधी आम्ही देतो आहे. उद्याच्याला नऊ डिसेंबरला पुरवणी मागण्या, नागपूरला अधिवेशन आहे त्यामध्ये माझ्या विभागाकडून आपण पुरवणी मागण्या सादर करतो आहे आणि त्याच्यातून जळगावच्याही जिल्ह्यातल्या वेगवेगळ्या तालुक्यामध्ये जर कुठे अतिवृष्टी झालेली आहे आणि त्याच्यातून काही पिक खराब झालेली असतील, नष्ट झालेली असतील तर त्याचा इथ स्वतः आमचे जिल्हाधिकारी देखील आहेत. जे सरकारनी धोरण ठरवल आहे ते फक्त विदर्भ-मराठवाड्याकरीता ठरवलेल नाही ते धोरण पुर्ण राज्याला लागू आहे.

कोकणामध्ये देखील आमचे सुनिल तटकरे प्रतिनिधीत्व करतात. कोकणामध्ये देखील काही अतिवृष्टीमुळं नुकसान झाल आहे, इतर पण काही भागांमध्ये झाल आहे. आणि तशा प्रकारच्या सुचना प्रशासनाला या निश्चितपणे दिल्या जातील ही पण बाब आजच्या या कांताई बंधाऱ्याच्या जलपुजन आणि उद्घाटनाच्याकार्यक्रमाच्या निमित्तानं माझ्या सगळ्या लोकप्रतिनिधींना आणि सर्व कार्यकर्त्यांना या निमित्तानं सांगू इच्छितो.

खरोखरच भाऊंच आजपर्यंतच जे काम आहे आमच्या सारख्या देखील तरुण कार्यकर्त्यांना वाटत की त्याचा ह्या सर्व कामांचा आदर्श ठेवून आपण त्या ठिकाणी पुढ गेल पाहिजे. आणि त्याच्यातून एक या राज्याचा सर्वांगीण विकास होण्याच्या दृष्टीकोनातून मनापासून त्या ठिकाणी प्रयत्न झाले पाहिजेत. आधुनिक तंत्रज्ञानानं संपुर्ण मानवी जीवन अलिकडच्या काळामध्ये व्यापून टाकलेल आपल्याला बघायला मिळत आहे. परंतु कुठल्याही तंत्रज्ञानाद्वारे अद्यापपर्यंत काही पाणी हे तयार करता आलेल नाही.

कुठल्याही कारखान्यामध्ये पाण्याच उत्पादन करता येत नाही आणि त्याच्यामुळ पाण्यासाठी आपल्याला जो काही पैसा खर्च करावा लागतो आहे त्याच्यामध्ये पाण्याची शाश्वती कधी कधी मिळत नाही. काम होतात परंतु पाऊस पडत नाही. अशा प्रकारची परिस्थिती आपल्यापुढे येते. ज्याला आपण मराठी भाषेमध्ये म्हणतो - आडातच नसेल तर पोहऱ्यात कुठून येणार? अशी कधी कधी परिस्थिती आपली सगळ्यांची निर्माण होते. पण एक गोष्ट चांगली झालेली आहे अलिकडच्या काळामध्ये अतिवृष्टी किंवा दुष्काळामुळं लोकांना पाण्याच महत्त्व पुर्वीच्या तुलनेनी मोठ्या



ठिबक सिंचनाची नळी यंत्रातून कशी तयार होते हे अजित पवार यांना अजित जैन दाखविताना.

प्रमाणावर समजायला लागलेल आहे. तुम्ही जळगावकरांनीच विचार करा. भाऊंनी तर हा विचार १९८८ साली ओळखलेला होता. त्याकाळामध्ये पवारसाहेब दुसऱ्यांदा राज्याचे मुख्यमंत्री झाले. त्यावेळेस ठिबक शिवाय या राज्याला आणि या देशाला तरणोपाय नाही. इस्त्राईलमध्ये जे चाललेल आहे त्याचच अनुकरण तुमच्या माझ्या राज्यात आणि तुमच्या माझ्या देशामध्ये केल्याशिवाय खऱ्या अर्थानी आपल्याला चांगल्याप्रकारची शेती फुलवता येणार नाही, अशाप्रकारचा विचार भाऊंच्या मनामध्ये त्या काळामध्ये आला. नंतरच्या काळात थोडासा जैन उद्योग समुह अडचणीत आला. परंतु अडचणीत आला तरी भाऊ डगमगले नाहीत. त्यांनी ते चालू ठेवल आणि नंतर मग जो उद्योग समुह अडचणीत आलेला होता त्यालाच अडचणीतून बाहेर काढल. आणि अडचणीमध्ये असणारे इतर तशाच प्रकारचे उद्योग त्या ठिकाणी टेकओव्हर केले आणि ते पण चांगल्या पद्धतीनं चालवून दाखविले. अशा प्रकारे शिक्षणातल्या संदर्भातल ज्ञान, त्याच बरोबर पाण्याच्या संदर्भातल ज्ञान, कमी पाण्याचा वापर करून कशा प्रकारे आधुनिक पद्धतीनं शेतीवाडी त्या ठिकाणी करता येईल आणि बळीराजा समाधानी कसा होईल याच प्रकारच व्रत भाऊंनी घेतलेले आहे. त्याचे जेवढे कौतुक करावे तेवढ थोडे आहे. आज मी आपल्याला जाता जाता गोष्ट सांगू इच्छितो की सिलींगचा कायदा काही झाल तरी आम्ही लोक सरकारमध्ये मंजूर करणार नाही. एकतर १८ एकराच सिलींग आणल, त्याच्यातच माझ्या शेतकऱ्याच भागेना. आजही शेतकरी आत्महत्या करतो आहे. आजही शेतकरी त्या ठिकाणी त्याच्या शेतीचे तुकडे तुकडे करतो आहे भावांच्या त्या ठिकाणी वाटण्या होता आहेत. मधल्या काळामध्ये एक संभ्रम अवस्था निर्माण झालेली होती की सिलींगचा कायदा येतो का काय? हा कायदा आणण्याचा अधिकार केंद्राला नाही, हा कायदा आणण्याचा अधिकार राज्याचा आहे. राज्याच प्रतिनिधीत्व करणारे आम्ही सगळे जणं तुम्हाला ठाम विश्वास देऊ इच्छितो की तुम्ही अजिबात खातेफोड करण्याच्या भानगडीमध्ये पडू नका. महसूल खात्याकडे जाऊ नका. त्याच्यामध्ये तुमचा सिलींगचा कायदा खाली आणला जाणार नाही. त्याचबरोबर अलिकडच्या काळामध्ये आता फुड सिक्युरिटी ॲक्ट हा नवीन कायदा मधल्या काळामध्ये केंद्रसरकारनी त्या ठिकाणी केला. आणि त्याच्यामध्ये एक रुपया किलोनी ज्वारी-बाजरी, दोन रुपये किलोनी गहू, तीन रुपये किलोनी तांदूळ, हा राज्यातल्या आणि देशातल्या ६७ टक्के जनतेला द्यायचा निर्णय झालेला आहे. १ लाख २५ हजार कोटी रुपयांची सबसिडी केंद्रसरकार या कामाला

देणार आहे.

आता सगळ्या जिल्ह्यांत आणि तालुक्यांमध्ये याच्या याद्या तयार करण्याच काम लवकरच सुरू होणार आहे. माझी या शेतकरी मेळाव्याच्या निमित्त्यानं आपल्याला तमाम सर्व कार्यकर्त्यांना लोकप्रतिनिधींना विनंती आहे की आपल्या आपल्या भागातले खरोखरीच गरीब हे जे कोणी माणसं आहेत ही जनता आहे त्यांची नाव त्या ६७ टक्क्यांमध्ये आली पाहिजे. माग दारिद्र्यरेषेखाली जी यादी केली त्याच्यामध्ये नको त्या माणसांची नाव आली आणि गरजू माणस काही काही बाजूला राहिली. ती मात्र अडचण आता येऊ देऊ नका. आणि त्या प्रकारे ६७ टक्के जनतेला या शहरी भागामध्ये थोडे कमी आहेत आणि ग्रामीण भागामध्ये जास्त आहेत. माझ्या ग्रामीण भागातल्या लोकांनी आपली स्वतःची नाव त्याच्यामध्ये आणण्याचा पण तो गरीब असला पाहिजे. उगीच स्वतः गाडी घेऊन फिरतो आहे आणि मला रुपया किलोनी द्या त्याला मिळणार नाही. त्याच्यामध्ये पाच आकडी पगार आहे आणि त्याला रुपया किलोमध्ये मिळणार नाही. जो गरीब आहे, जो मध्यमवर्गीय आहे अशांना आम्ही ते धान्य देणार आहे. आणि शेतकऱ्यांनी पण काळजी करू नये की एक रुपया किलोनी आता ज्वारी गहू, दोन रुपये किलोनी ज्वारी, बाजरी. दोन रुपये किलोनी गहू आणि तीन रुपये किलोनी तांदूळ देत असताना आमच्या धान्याला तेवढाच दर मिळणार का? नाही. तुम्हाला जी आधारभूत किंमत दिलेली आहे तो दर मिळणार आहे. आता जशी साखरेची दहा टक्के लेव्ही काढून टाकली राज्यसरकारला मार्केटमध्ये जाव लागत आणि रेशनच्या दुकानावर साखर देण्याकरीता मार्केटमधूनच साखर घ्यावी लागते आणि ती स्वस्त धान्य दुकानामध्ये द्यावी लागते. तसच काम आपल्या शेतकऱ्यांच्या बाबतीमध्ये घडणार आहे.

बऱ्याचदा मला महाराष्ट्रामध्ये फिरत असताना शेतकरी म्हणतो आता रुपयामध्ये ज्वारी बाजरी दिली. दोन रुपयात गहू आणि तीन रुपयात तांदूळ दिला तर आम्ही पिकवलेल कोण खाणार आहे? या सगळ्या ६७ टक्के लोकांना हे सगळ देण्याकरीता शेतकऱ्यांनीच ते पिकवायचं, शेतकऱ्यांनाच चांगला दर दिला जाईल. आणि क्रॉस सबसिडी देणार आहे ते केंद्रसरकार देणार आहे आणि त्या गरीबाला कुणीही इथं उपाशीपोटी झोपता कामा नये, भुकबळी कुठेही होता कामा नये त्याकरीता अशा प्रकारचा निर्णय केंद्रसरकारनी घेतलेला आहे. राज्यसरकार पण तशा प्रकारची अंमलबजावणी करण्याचा मनापासूनचा त्या ठिकाणी प्रयत्न करत आहे. ही पण गोष्ट आपण सर्व सहकारी मित्रांनी ह्या कार्यक्रमाच्या निमित्तानं ध्यानामध्ये घ्यावी अशा प्रकारची माझी आपल्याला सगळ्यांना आग्रहाची नम्रतेची कळकळीची विनंती आहे. वेगवेगळ्या धरणाच्या माध्यमातून पाण्याची गरज भागत असताना वीजेची पण गरज कशी भागवता येईल अशा प्रकारचा प्रयत्न आमचा सगळ्यांचा चाललेला आहे. धरणामुळे आपल्या सगळ्यांची तहान भागविण्याच काम आम्ही करतो, शेती पिकविण्याच काम आम्ही करतो, त्यामुळ जनतेला अन्न त्या ठिकाणी मिळत, उद्योग वेगवेगळ्या प्रकारे महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यामध्ये उभे राहतात, म्हणूनच धरण आधुनिक भारताच मंदिर हे भाक्रानांगलचे उद्घाटन करीत असताना पंडीत जवाहरलाल नेहरूंनी त्याचा उल्लेख केलेला होता आणि आज देखील एक चांगल्या प्रकारच काम भाऊंच्या प्रेरणेनं जैन उद्योग समुहानी बांधल्याबद्दल मी जैन उद्योग समुहाच मनापासून अभिनंदन करतो, त्यांचे मनापासून आभार मानतो. महाराष्ट्रातल्या साडे अकरा कोटी जनतेच्या वतीनं मी भाऊंच या कामाच्या बद्दल अभिनंदन करतो आणि अशाच पद्धतीच काम इतरांनी देखील कराव ही अपेक्षा व्यक्त करून मी आपल्या सगळ्यांची रजा घेतो.

जैन उद्योग समुहातर्फे तयार केल्या जाणाऱ्या गांडुळ खताची अजित पवार पाहणी करताना. शेजारी अजित जैन व आर.बी. जैन.

गिरणेवरील सात बंधाऱ्यांच्या कामाला चालना देऊ

जलसंपदामंत्री सुनील तटकरे यांची ग्वाही

खरंतर राज्यसरकारच्या वतीने आदरणीय भाऊ आपले आणि आपल्या परिवाराचे जेवढे ऋण मानावे तेवढे थोडेच राहतील. सामाजिक कृषीतंत्रामध्ये तंत्रज्ञानाची एक वेगळी भर आपण आपल्या कर्तृत्त्वातून घातलीत. कृषीप्रधान अर्थव्यवस्था असलेल्या या देशामध्ये आणि आपल्या राज्यामध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करत कृषीक्षेत्रातल्या बदलाला एक वैचारीक दिशा आपल्यामुळे त्या निमित्ताने मिळाली. शेती आणि शेतीवरचे नवनवे प्रयोग उभ्या महाराष्ट्रात आणि देशभरामध्ये घडले जात असताना ज्या खान्देशाच्या परिसरामध्ये कमी पर्जन्यमान होत, खूप मोठ्या प्रमाणावरती या ठिकाणी उन सुद्धा असत. तुलनात्मकदृष्ट्या महाराष्ट्राच्या अन्य भागाच्या दृष्टीकोनातून कमी पद्धतीने पाऊस पडत असतो. अशावेळेला केळीचे प्रचंड उत्पादन असलेल्या या सबंध जिल्ह्यामध्ये शेतीचे नवनवीन प्रयोग घेण्याच्या दृष्टीकोनातून आपल्या उद्योग समुहाने पहिल्या प्रथम खूप मोठ्या प्रमाणावरती चालना दिली. एका बाजूला या शेतीच्या उत्पादनातल्या नवीन तंत्रज्ञानाचा वापर आपण करण्यासंबंधीची दिशा दिलीच परंतु ठिबक सिंचनाचा वापर करण्याच्या दृष्टीकोनातून एका बाजूला पाण्याची बचत आणि मग उत्पन्नातली भरघोस वाढ. ज्या ठिकाणी काही नगदी पिक आपण या राज्यामध्ये घेत असतो त्या ठिकाणी पाण्याचा वापर मुक्तपणाने होत असतो. कळतनकळत पाण्याचा वापर हे दुप्पट-तिप्पट प्रमाणामध्ये त्या ठिकाणी होत असतो. आणि या साऱ्याचा परिणाम शेतीचा कस दिवसेंदिवस कमी होण्यामध्ये सुद्धा खूप मोठ्या प्रमाणावरती होत असतो. अशा वेळेला ठिबक तुषार सिंचनाची पद्धती करण्याच्या दृष्टीकोनातून आपणही प्रयोग केलेत. नुसते प्रयोग करून आपण थांबला नाही तर तशा वेळी उत्पादनाची जोड देत त्याची सांगड राज्य आणि केंद्र सरकारच्या विविध योजनांची घालण्याच्या दृष्टीकोनातून सुद्धा राज्यसरकारकडे आपण एक उत्तम प्रस्ताव त्या निमित्तानं दिला. आणि म्हणूनच गेल्या १५-२० वर्षांत महाराष्ट्रामध्ये खूप मोठ्या प्रमाणावरती सिंचनाखाली क्षेत्र आले. एका बाजूला सिंचनाच

क्षेत्र वाढल किती वाढल याच्यावरती चर्चा होत असतानाच ठिबक सिंचनाच क्षेत्र खूप मोठ्या प्रमाणावरती वाढविण्याच्या दृष्टीकोनातून आपला सहयोग आणि सहभाग सुद्धा त्या निमित्ताने निश्चितपणे आहे.

निसर्ग ज्यावेळेला बदलतो, निसर्गाचा समतोल ज्यावेळेला ढासळतो त्याच्यामुळे किती मोठ्या प्रमाणावरती माणसांच्या मनावरती लोकांच्या जीवनावरती खूप मोठ्या प्रमाणावर परिणाम होतात हे गेल्या ७-८ वर्षांमध्ये महाराष्ट्राच्या भुमीने निश्चितपणाने अनुभवल आहे. अशा वेळेला त्रस्त झालेल्या शेतकऱ्यांना मदत करण, त्यांच जीवन पुन्हा उभ करण, उध्वस्त झालेली शेती ती अतिवृष्टीमुळे असेल, उध्वस्त झालेली शेती जी कदाचित किंवा जळलेली आमच्या फळबागा असतील ज्या कदाचित कमी पाण्यामुळे असतील त्या शेतकऱ्यांच जीवन पुन्हा उभ राहिल पाहिजे हा द्रष्टा दृष्टीकोन या महाराष्ट्राच्या सरकारने सुद्धा त्या निमित्ताने स्वीकारला. पण खचितच या गोष्टीचा अभिमानपूर्वक उल्लेख आज व्यासपिठावरती करावासा वाटतो की ज्या पद्धतीने भवरलालजींनी आणि त्यांच्या सर्व सहकाऱ्यांनी त्यांच्या उद्योग समुहानी या क्षेत्रामध्ये भरीव क्षेत्रामध्ये काम करण्याचा प्रयत्न केला. तस आज या देशाच्या कृषीक्षेत्रामधली सुद्धा एक दुसरी क्रांती या देशाचे नेते आदरणीय पवार साहेबांच्या नेतृत्त्वाखाली घडलेली सुद्धा आपल्याला पाहायला मिळू शकते. बागायती क्षेत्रामध्ये सुद्धा फळबागांना रोजगार हमी योजनेची सांगड घालण्याच्या दृष्टीकोनातून. मी ज्या प्रांतातून निवडून येतो तिथे पाऊस प्रचंड प्रमाणावरती पडतो.

पश्चिम वाहिनी नद्यांच्या मार्फत अरबी समुद्राला तितक्याच प्रचंड वेगाने जाणार पाणी आणि त्याचवेळेला कमी पर्जन्यमानामध्ये केळीसारख्या बागायती पिकाच कष्टाने उत्पादन करणार आमचा या जिल्ह्यातला शेतकरी अस ज्यावेळेला चित्र पाहायला मिळत त्या वेळेला या सगळ्या परिसरातील काही महत्त्वपूर्ण काम हातामध्ये घेण अत्यंत आवश्यक ठरू शकत.

राजकारणाच्या पटावरती काही प्रत्येक गोष्ट त्याच पद्धतीनं मोजली गेली पाहिजे अशातला काही भाग नाही. काही समारंभ असे असतात की ज्यावेळेला काही घडलेल्या चांगल्या गोष्टी आणि उद्याच्या भविष्यामध्ये आमच्या जिल्ह्यामध्ये आपल्या परिसरामध्ये काही चांगल्या गोष्टी आपल्याला करायच्या असतील तर त्यावेळेला सरकारजवळ आपला सर्वांचा संवाद असणे अत्यंत आवश्यक होऊ शकणार. विधीमंडळामध्ये सुद्धा वेगवेगळ्या बाबतीमध्ये आपण चर्चा करीत असताना काही वेळेला टिका सुद्धा करत असतो, परंतु त्याच वेळेला आपल्या मतदार संघातील आपल्या जिल्ह्यातील काही प्रश्न मग ते जलसंपदा विभागामार्फत असतील, सिंचनाचे असतील, कालव्याचे असतील, धरणाचे असतील, काही वेळेला भुसंपादनाचे असतील, पुनर्वसनाचे असतील आणि त्याच वेळेला उपसा सिंचन योजना सुद्धा असतील ते सोडविण्याच्या दृष्टीकोनातून सुद्धा आपण आग्रही आहोत. म्हणूनच अनेक वेळेला आपला समाज बैठकीच्या माध्यमातून घडत असतो. राजकारण असेल त्यावेळेला राजकारण जरूर

कंपनीत बनणाऱ्या सोलर पॅनेलची अजित पवार पाहणी करताना. शेजीर सुनिल तटकरे, आर.बी. जैन व अजित जैन.

होत असेल पण त्याच्याही पलिकडे जाऊन समाजाचा व्यापक हिताचा विचार एक लोकप्रतिनिधी म्हणून आपण सर्वजण करीत असतो त्यावेळेला त्या विचाराला पुरक आणि पोषक वातावरण कस निर्माण करता येईल याच गोष्टीवरती भर ठेवण्याचा प्रयत्न आपल्याला सर्वांना करण आवश्यक ठरू शकत आहे. मला जाणीव आहे की एकेकाळी जळगावसारख्या शहरामध्ये पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुद्धा खूप मोठ्या प्रमाणावरती होता. अजितदादांच्या नेतृत्वाखाली जलसंपदा विभागाच्या मार्फत वाघूर प्रकल्पाची त्या कालावधीमध्ये सुरुवात झाली. आणि आता या वर्षी जवळपास साडेअकरा टीएमसीचा पाण्याचा साठा झाला. त्यामुळे पिण्याच्या पाण्याच्या बरोबर अन्य काही कारणासाठी आपल्याला जे काही पाणी उपलब्ध लागणार आहे त्या पाण्याची उपलब्धी आता आपल्याला पुढच्या कालावधीमध्ये सुद्धा खूप मोठ्या प्रमाणावरती सुद्धा निश्चितपणाने होणार आहे. या वर्षीच आज आमच नियोजन आहे कारण या कार्यक्रमाच्या निमित्ताने एखादा उद्योग समुह, एखादा प्रकल्प, एका विशिष्ट कालावधीमध्ये ज्या वेळेला पुर्ण करतो आणि विभागाचा प्रमुख म्हणून मी ज्या वेळेला या समारंभाला येतो त्याला आमच्या विभागामार्फत सुद्धा या वर्षामध्ये आम्हाला काय नेमक काम करायच आहे, काय काम करण्यावरती आम्ही भर ठेवणार आहोत हे जर काही या ठिकाणी सांगू शकलो तर या समारंभाच औचित्य या लोकांसाठी आपल्या जळगाव जिल्ह्यासाठी अत्यंत महत्त्वपुर्ण ठरणार आहे या दृष्टीकोनातून सुद्धा प्रयत्नांची पराकाष्ठा ही पुढच्या कालावधीमध्ये सुद्धा आम्ही निश्चितपणे करणार आहोत. या वर्षाचा मध्यम प्रकल्प नवा प्रकल्प पुर्ण करून जवळपास १२ हजार हेक्टर सिंचनाच क्षेत्र निर्माण करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. त्याच्यात माझा मुळ प्रकल्प असेल, भोवळा असेल, मोर असेल किंवा मुंगळ असेल हे मध्यम प्रकल्प पुर्ण करण्याच्या दृष्टीकोनातून आपल्याला प्रयत्नांची, पराकाष्ठा तर करावीच लागेल परंतु या जिल्ह्याच्या दृष्टीकोनातून महत्त्वाचा असलेला वाघूरचा प्रकल्प असेल, निम्न तापी असेल, शेळगावच बॅरेज असेल, वरकरे लोंढे या प्रकल्पाची गती ही सुद्धा वाढविण्याची आवश्यकता खूप मोठ्या प्रमाणावरती आहे.

अनेक वेळेला ज्यावेळेला टिका-टिपणी होत असते त्यावेळेला प्रकल्पाच्या कामावरती कळत न कळत त्याचा परिणाम होत असतो. त्याचा दूरगामी परिणाम लोकांच्या जीवनावरती सुद्धा खूप मोठ्या प्रमाणावरती होत असतो. निसर्गाच्या बदललेल्या समतोलामुळे पर्जन्यमान आज शाश्वत स्वरूपात राहिले नसल्यामुळे ज्या ज्या वेळेला पाणी आपल्याला जितक्या मोठ्या प्रमाणावरती अडवता येईल आणि त्या शेतकऱ्यांच्या शिवारामध्ये आपल्याला उत्तमपणे पोहोचवता येईल या साऱ्याच गोष्टींवरती भर ठेवण्याचा प्रयत्न आपल्याला सर्वांना करण आवश्यक आहे. म्हणून इथल्या लोकप्रतिनिधींच्या बरोबर अनेक वेळेला बैठका झाल्या.

आपआपल्या विधानसभा क्षेत्रातील जळगावमधले काही प्रकल्प व्हावे. काही प्रकल्प रखडलेले आहेत भुमी संपादनामुळे. काही ठिकाणी आपल्याला प्रकल्पाच पुनर्वसन करायच आहे आणि काही ठिकाणी वनसंपत्ती वनजमीनी याच्यामुळे सुद्धा काही प्रकल्पाची आज गरज होते आहे. या सर्वच गोष्टींना चालना देण्याचा प्रयत्न हा आम्ही निश्चितपणे या ठिकाणी करणार आहोत.

गुलाबराव देवकर साहेब तुम्ही आज या ठिकाणी भावना व्यक्त केलीत. या गिरणा नदीवरील सात बंधाऱ्याच्या कामाला आपल्याला चालना द्यायची आहे. याच्यामधल पाणी उपलब्धतेच प्रमाणाबाबतीमध्ये आपण अजितदादांकडे एकदा बैठक घेतली, आपण एकदा माझ्याकडे घेतली. मी आज या कार्यक्रमाच्या प्रसंगी आपल्या सर्वांना सांगू करू इच्छितो आहे की येत्या १५-२० दिवसांमध्ये पाणी उपलब्धतेच प्रमाणपत्र मिळेलच आणि मग त्याच्यामधून पुढची करावयाची कार्यवाही ही करण्यासंबंधीच सुद्धा धोरण आपल्याला निश्चितपणाने घ्याव लागेल.

कविवर्य ना.धों. महानोर साहेबांनी सुद्धा एक महत्त्वाचा प्रकल्पाच या ठिकाणी सांगितल की याच्यातील नदीजोड प्रकल्प आणि नारपार गिरणा प्रकल्पाचा एक पाठपुरावा जो आज करायचा आहे, जो गतिमान करून त्याच्यातून त्या सगळ्या परिसरामध्ये जे काही पाणी आपल्याला उपलब्ध करायच आहे त्याचा पाठपुरावा एनडब्ल्यूडीए कडे तर आपण सुरू केलेलच आहे आणि राज्यसरकार कडून डीपीआर कडून सादर करण्याचा प्रयत्न हा येत्या कालावधीमध्ये सुद्धा निश्चितपणाने आम्ही सगळे जणं करू हे आज या कार्यक्रमाच्या प्रसंगी मी आपणा सर्वांना सांगू इच्छितो.

दादा आपल्यालाही कल्पना आहे आपण या कामामध्ये पुढाकार घेतला. जळगाव जिल्ह्यामध्ये शेतकऱ्यांनी पुढाकार घेत काही उपसा सिंचन योजनेची त्या कालावधीमध्ये मांडणी केली होती. खूप मोठ्या प्रमाणावरचा खर्च त्यांचा थकित राहीलेला होता. नासिकच्या त्या ऐतिहासिक स्वरूपाच्या बैठकीमध्ये आपण तो कर्जमाफीचा निर्णय घेतला त्याच्यातून त्या त्या संस्थांच्या वरती जे काही कर्जाच ओझ होत त्याच्यातून ते मुक्त झाले. परंतु दुर्दैवाने आज त्या उपसा सिंचन योजना पुर्णपणाने बंद आहेत. महाराष्ट्रातला काही भौगोलिक भाग की ज्या ठिकाणी आज प्रवाही सिंचनाची व्यवस्था आपण करू शकत नाही. अशा वेळेला उपसा सिंचन योजनाशिवाय दुसरा कुठला पर्याय असु शकत नाही. जळगाव



जिल्ह्यामध्ये सुद्धा काही उपसा सिंचन योजनाची गरज आहे. कृष्णाच्या खोऱ्यात सुद्धा उपसा सिंचनाची गरज आहे. कोणी तज्ज्ञ काही वेळेला सांगण्याचा असा प्रयत्न करीत असेल की या सगळ्या उपसा सिंचन योजनेची गरज अजिबात बिल्कूल नव्हती. तर या जळगाव जिल्ह्यातल्या जनतेनी सांगाव की ज्या तज्ज्ञाने हे मत व्यक्त केल हे काय खर आहे की काही निमित्ताने खोट आहे? जर काय आपल्याला लोकांचे प्रश्न सोडवायचे असतील तर काही उपसा सिंचन योजना कार्यन्वित केल्याशिवाय दुसरा कुठला पर्याय असू शकत नाही. आणि म्हणूनच मी अजितदादांकडे या निमित्ताने विनंती करतो आहे की त्या कालावधीमध्ये सहकारी संस्थांना आपण कर्ज माफ करून एकत-हेचा दिलासा दिला परंतु प्रत्यक्षपणाने सिंचन क्षमता निर्माण करण्याच्या दृष्टीकोनातून या ज्या काही उपसा सिंचन योजना आहेत ज्या बंद अवस्थेत आहेत त्या कार्यान्वित करण्याच्या दृष्टीकोनातून आपल्याला प्रयत्न करण अत्यंत आवश्यक ठरू शकत आहे.

आज जळगाव जिल्ह्यातील समस्त लोकप्रतिनिधींना माझी विनंती आहे. एक तर आज भवरलालजी आहेत त्यांनी एक आदर्श आपल्या सगळ्यांच्या समोर ठेवला आहे. मी अजितदादांना विनंती केली की असा प्रस्ताव आम्ही ज्या वेळेला पाठवू की या जिल्ह्यातील बंद असणाऱ्या उपसा सिंचन योजना आपल्याला चालू करायच्या आहेत त्या दुरूस्त करण्याचा खर्च आपला विभाग करेल पण नंतर मग मात्र त्याची जबाबदारी जर का आपल्यापैकी कोणी जर सहकारी कारखान्यांनी किंवा उद्योग समुहांनी घेतली तर त्याचा दूरगामी परिणाम या जिल्ह्याच्या शेतीमालाच्या आणि तत्सम असलेल्या उद्योग आणि अनेक कारणासाठी सुद्धा निश्चितपणानी होऊ शकतो आहे.

मधल्या कालावधीमध्ये भवरलालजी माझ्याकडे एक सादरीकरण झाल. कर्नाटकच्या परिसरामध्ये धरणाच्या उभारणीपासून ते कालव्याच्या ऐवजी बंद पाईपलाईनद्वारे शेतकऱ्यांच्या शिवारामध्ये पाणी देण्याचा एक उत्तम प्रयोग आपल्या उद्योग समुहाने अत्यंत यशस्वीपणे राबविला. माझ्याकडे सादरीकरण झाल्यानंतर महाराष्ट्राच्या या पाचही महामंडळामध्ये, कोकणामध्ये सुद्धा आम्ही असा प्रयोग करण्याचा प्रयत्न करतो आहोत. याच्यामध्ये आपल्या उद्योग समुहाने जर का पुढाकार घेतला, कारण आज पाण्याच जे काही खूप मोठ्या प्रमाणावरती गैरवापर होतो आहे. जवळपास ३० टक्के पाण्याचा वापर होतो, ६०-७० टक्के पाणी वाया जात. पण आपण हे जे काही चांगल्या पद्धतीच उदाहरण आज शेजारच्या कर्नाटक राज्यामध्ये दिल अशा पद्धतीच जर काही आपण उदाहरण घेऊन एक-एक प्रकल्प महामंडळाच्या अंतर्गत करायच ठरवल तर त्याच्यातून पाणी वाचेल, खूप मोठ्या प्रमाणावरती क्षेत्र सुद्धा वाढेल आणि कृषीमालाच्या उत्पन्नामध्ये खूप मोठ्या प्रमाणावरती भर होईल, शेती सुद्धा शेतकऱ्यांना परवडू शकेल असा एक नाविण्यपुर्ण प्रयोग आज आपल्या उद्योग समुहाच्या मार्फत झालेला आहे त्याचा

स्वीकार आता राज्यसरकार पुढच्या कालावधीमध्ये करेल अस आपल्या उद्योगाला या निमित्तान मी सांगण्याचा प्रयत्न करू इच्छितो आहे. कारण एखादा प्रकल्प कार्यान्वित झाल्यानंतर त्याचा फरक किती मोठ्या प्रमाणावरती होऊ शकतो हे आजच्या या प्रकल्पाच्या माध्यमातून आपण सर्वांनी निश्चितपणे अनुभवल आहे. प्रकल्पाला मंजुरी २००७ मध्ये दिली अजितदादांनी. प्रकल्प सुरू होण्यासाठी पाच वर्षाचा कालखंड झाला. काही अडचणी जरूर आल्या कधी इतर काही कारणांसाठी असतील. पण हा असा एकमेव प्रकल्प की ज्या प्रकल्पाला भुमी संपादन आपल्याला कराव लागल. त्याच्यामुळे शेतकऱ्यांचा सहयोग आणि शेतकऱ्यांच्या कामामध्ये असलेला एकंदरीत सहभाग. काही प्रसंगी काही अडचणी आल्या असतील पण त्या अडचणींवरती मात करण म्हणजे जैन उद्योगाची महत्त्वाची खासियत आहे. अडचणीला सामोरे जात आपल उद्दिष्ट पूर्ण करण्याच्या वरतीच भवरलालजी आपण अतिशय कष्टाने आणि नेटाने प्रयत्न केलेत. याच्यामुळे आज एक यशस्वीतेच्या मार्गावरती गेलेला एक चांगला प्रकल्प एक चांगला उद्योग समुह आज आपल्याला कुठे ना कुठेतरी पाहायला मिळतो आहे.

हा उद्योग समुह केवळ आमच्या महाराष्ट्रापुरता सिमीत राहिला नाही, आपल्या देशापुरता सिमीत राहिला नाही तर दुनियेच्या बाजारामध्ये वेगवेगळ्या प्रगत राष्ट्रांमध्ये जाऊन उद्योग समुहाने आपल्या उद्योगाची चुणूक त्या ठिकाणी दाखविली. आणि आज जगाच्या बाजारपेठेमध्ये उद्योगक्षेत्रामध्ये आमचा भारत आणि आमचा महाराष्ट्र कुठेही कमी नाही हे आपल्या रुपाने आम्हाला सर्वांना जाणवायला मिळाल त्याचाही खास उल्लेख आज या कार्यक्रमाच्या प्रसंगी या ठिकाणी मी करू इच्छितो आहे.

सार्वजनिक जीवनामध्ये आपण वावरत असताना आपण आणि आपल कुटुंब आणि आपला उद्योग याच्यापर्यंत आपण पाहत नाही, तर आपल्या उद्योगातून मिळणारा फायदा हा लोकांसाठी आहे ही भावना आपण उराशी बाळगत आपण या कृषीक्षेत्रामध्ये उत्तम पद्धतीने बदल केले, एक शैक्षणिक कार्य त्या ठिकाणी केल. महात्माजींचे कार्य नवीन पिढीच्या मुलांना सुद्धा समजावे. केवळ इतिहास वाचून चालत नाही तर तो समग्रपणाने पाहायला मिळावा अशा पद्धतीच एक चांगल तीर्थ आपण त्या ठिकाणी उभ केल. म्हणून आपल्याला धन्यवाद देण्यासाठी शब्द त्या ठिकाणी निश्चितपणाने कमी पडतील अस एक उत्तम समाज उपयोगी कार्य आपल्या आणि आपल्या उद्योग समुहाच्या मार्फत या ठिकाणी होत आहे. अधिक बोलून मी आपल्या सर्वांचा वेळ घेऊ इच्छित नाही, परंतु हे सगळ काम मी मघाशी सांगितल की हे पहिल्या प्रथम महाराष्ट्रामध्ये घडत आहे. हा पहिला प्रयोग आहे. आणि या पहिल्या प्रयोगामध्येच आपण २०१० सालामध्ये करार केला, ज्याच्यातून काम पुर्णपणाने झालेल आहे. आणि पाणीसाठा सुद्धा निर्माण झालेला आहे. म्हणूनच भविष्याच्या कालावधीमध्ये हा सरकारकडे हस्तांतरीत करण्याचा आपल्याला जे काही काम करायच असेल ते नियमानुसार आपण पुढच्या कालावधीमध्ये करू. त्याच्यातल पाणी वापरासंबंधी आपण जे काही ठरवललेल आहे ते पाणी वापर आपल्यासाठी आणि या भोवतालच्या परिसरातल्या शेतकऱ्यांसाठी सुद्धा तातडीने उपलब्ध १०० टक्के होईल असाच आशावाद या कार्यक्रमाच्या प्रसंगी या ठिकाणी व्यक्त करतो. पण जाता जाता हा जो काही बंधारा झालेला आहे हा बंधारा आमच्या जलसंपदा विभागाच्या मार्फत अजितदादांच्या मुळे त्या वेळेला कार्यान्वित होऊ शकला आणि तो आपल्या उद्योग समुहानी केलेला आहे. आणि म्हणूनच हा जो काही बंधारा आहे तो नागझरी बंधारा आहे उपपद्धतीचा बंधारा आहे याच नामकरण कांताई बंधारा अस झाल अस राज्यसरकारच्या वतीने मी या ठिकाणी जाहीर करतो. राज्यसरकरांनी त्याचा स्वीकार केलेला आहे हे सुद्धा मी नम्रपणाने सांगतो. आणि आज कांताईंच्या नावाने सुरू झालेला हा बंधारा भविष्याच्या कालावधीमध्ये महाराष्ट्रामधल एक नवीन आशादायी चित्र निर्माण करण्याच्या दृष्टीकोनातून तो आम्हाला एक प्रेरणादायी ठरेल. अशाच प्रकारच्या सहभागातून आपण वेगवेगळी काम करण्याच्या प्रयत्न करू.

एक निश्चितपणाचा मी दावा करू शकतो आज या व्यासपिठावरती सिंचनाच क्षेत्र नेमक किती झाल, काय झाल याच्यावरती अनेकवेळा वादविवाद होऊ शकतात पण गेल्या १०-१२ वर्षांमध्ये सिंचनाच्या क्षेत्रामध्ये भरीव वाढ होत ६.१८ पर्यंत या राज्याच सिंचनाच क्षेत्र हे १०० टक्के वाढलेल आहे हे सुद्धा सांगण्याचा प्रयत्न मी या कार्यक्रमाच्या प्रसंगी करू इच्छितो आहे. दरवर्षी किमान दीड ते दोन लाख हेक्टर सिंचनाच क्षेत्र निर्माण करायचच अशा पद्धतीचा निर्णय आमच्या विभागाने आपापल्या परिसरामध्ये घेतलेला आहे. त्याच्यातून भविष्याच्या कालावधीमध्ये सुद्धा रखडलेले प्रकल्प मर्यादीत कालावधीमध्ये पुर्ण करण आणि त्या प्रकल्पाच पाणी लोकांच्या शिवारापर्यंत शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवण हे उद्दिष्ट नजरेसमोर ठेवत आम्ही सगळे जणं काम करण्याचा निश्चितपणाने प्रयत्न करू एवढंच आज या कार्यकमाच्या प्रसंगी आवर्जून या ठिकाणी सांगतो. पुन्हा एकदा आमच्या विभागाच्या वतीने भाऊंना आणि त्यांच्या सर्व परिवाराला मी मनापासून धन्यवाद देतो.